# कार्यालय, नागपूर महानगरपालिका, नागपूर
## शिक्षण विभाग

दुरध्वनी क्र. 0712–2567028
EmailID:education.nmc@gmail.com

जा.क्र. 3720 / शि.वि. / 2015
दि. 07 / 02 / 2015

**प्रति,**

मुख्याध्यापक / मुख्याध्यापिका,
सर्व प्राथ. / उच्च प्राथ. / माध्य. शाळा
म.न.पा., नागपूर.

**विषय :– स्व.दिनदयाल उपाध्याय यांचे स्मृतीदिन प्रित्यर्थ दि.11.02.2015 रोजी मानव श्रृखंला तयार करण्याबाबत.**

**संदर्भ :– दि. 07.02.2015 रोजीचे मा.अध्यक्ष, स्थायी समिती, यांचे बैठकीतील निर्देशानुसार.**

उपरोक्त विषयान्वये कळविण्यात येते की, मा. पंतप्रधान श्री. नरेंद्रजी मोदी यांचे आवाहनानुसार संपूर्ण भारतभर महिला सबलीकरणकरीता ''बेटी बचाओ, बेटी पढाओ'' अभियान राबविण्यात येत आहे. आपल्या भारत देशाच्या महान संस्कृतीमध्ये अनेक महिलांनी उल्लेखनीय कार्य केलेले आहे. हिच परंपरा आजही सुरू आहे. अश्या या बालिकांचे प्रमाण भारत देशात दिवसेंदिवस घटत आहे. याबाबत जनजागृती करण्याकरीता स्व.दिनदयाल उपाध्याय यांचे स्मृतीदिना प्रित्यर्थ दि.11.02.2015 रोजी नागपूर शहरामध्ये सेंट्रल एव्हेन्यू रोडवरील पोद्दारेश्वर राममंदीर ते वैष्णवदेवी चौक, वर्धमाननगर या रस्त्यावर मानवी श्रृंखला तयार करावयाची आहे. सेंट्रल एव्हेन्यू रोडच्या परीसराजवळील मनपा शाळांतील विद्यार्थ्यांना शालेय गणवेशात सकाळी 09.00 वाजता उपरोक्त रोडवर उपस्थित ठेवावयाचे आहे. यामध्ये संत मीराबाई, संत जनाबाई, राणी लक्ष्मीबाई, क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले, मातोश्री रमाबाई आंबेडकर, स्व. कल्पना चावला, स्व. इंदीरा गांधी, स्व. मदर टेरेसा, मा. प्रतिभाताई. पाटील (माजी राष्ट्रपती), मा. किरण बेदी, सुनिता विलीयम्स, नवदुर्गा इत्यादी महान स्त्रीयांच्या वेशभुषेत मुलींना मानव श्रृंखलेत उपस्थित ठेवावयाचे आहे. विद्यार्थ्यांच्या हाती ''बेटी बचाओ, बेटी पढाओ'' बाबत जन जागृती फलक असावे.

तरी आपल्या अधिनस्त सेंट्रल एव्हेन्यू रोडवरील पोद्दारेश्वर राममंदीर ते वैष्णवदेवी चौक, वर्धमाननगर या रस्त्याच्या परिसराजवळील म.न.पा. शाळांनी तसेच इतर भागातील इच्छूक शाळांनी मानव श्रृंखलेत सहभागी व्हावे. दि.11.02.2015 रोजी सकाळी 09.00 वाजता सेंट्रल एव्हेन्यू रोडवर संपूर्ण विद्यार्थ्यांसह उपस्थित रहावे.

**टिप :–** 1) या मानवी श्रृंखलेत सर्वाधिक विद्यार्थी संख्येने सहभागी होणाऱ्या शाळांना प्रथम, व्दितीय व तृतीय असे तीन पुरस्कार देण्यात येतील.

2) पारंपारीक वेशभुषेमध्ये उपस्थित राहणाऱ्या विद्यार्थ्यांना पुरस्कार देण्यात येईल.

3) या कार्यक्रमाबाबत संबंधित शाळेतील मुअ. व टिम प्रमुखांनी खालील सयोजकांशी संपर्क साधावा.

1) श्री. क्षमा शंकर तिवारी मो. नं. 9370999966
2) श्री. विजय इमाने मो. नं. 7709047026
3) श्री. संजय पुंड मो. नं. 982292901
4) श्री. धनराज दाभेकर मो. नं.8446830483
5) श्री. संजय दिघोरे मो. नं. 9923760814
6)सौ. कुसूम चाफलेकर मो. नं. 9921616589
7) सौ. विणा ठाकरे मो. नं. 9326377873

**शिक्षणाधिकारी**
**नागपूर महानगरपालिका, नागपूर**

PC:2/D:\reshma:/Tembhurne sir \ Letter 1.doc